# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई-४००००१.

**PH:2264 1150,2 264 1151, 22620601, 22690602, FAX:2692102**

**Telegram : Edutech E-Mail : system@dte.org.inWebsite: http://www.dte.org.in**


क्रमांक: 3/डिटीई/2008/२४०८६

दिनांक:- १०/१०/२००८

प्रति,

सर्व शासकीय, शासकीय अनुदानित व विनाअनुदानित
एमबीए/एमएमएस, एमसीए, पदव्युत्तर पदवी अभियांत्रिकी
औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट कॅटरींग
टेक्नॉलॉजी पदवी व पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

विषय:- सामाजिक सुरक्षेच्या दृष्टीकोनातून संस्थांमधून पुरविण्यांत येणाऱ्या इंटरनेट सुविधेमध्ये घ्यावयाच्या दक्षतेबाबत.

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यांत येते की, सध्या देशाच्या विविध भागात होत असलेल्या बॉम्बस्फोटामध्ये अभियांत्रिकी शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचा सहभाग असल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर आपल्या संस्थांमधून विद्यार्थ्यांना पुरविण्यांत येणाऱ्या इंटरनेट सुविधा सामाजिक सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सक्षम ठेवण्यासाठी सदर सुविधा घेत असलेल्या विद्यार्थ्यांची पूर्ण माहिती संस्थेच्या लॉगबुकमध्ये नोंदविण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे. त्यासाठी अभ्यासक्रम अथवा इतर कारणास्तव संस्थेची इंटरनेट सुविधा वापरत असलेलया विद्यार्थ्याचे नांव, ओळखपत्र, कुठल्यावर्षाचा विद्यार्थी आहे त्याची नोंद, क्लासरुम, संगणक क्रमांक, संगणकावर बसण्याची वेळ तसेच संगणक सोडण्याची वेळ इत्यादी बाबी सदर लॉगबुकमध्ये घेतल्या तर भविष्यात अघटीत घटना न घडण्याबाबत कार्यवाही करणे शक्य होईल. तसेच ज्या संस्थांमध्ये वायरलेस (Wi-fi) नेटवर्कस आहेत अशा नेटवर्कस संबंधात अतिरिक्त सिक्युरीटी व ॲक्सेस ऑथीटीकेशन प्रणाली अंमलात आणावी.

तसेच संस्थेच्या वेळेत संस्थेत उपस्थित राहून मध्येच संस्थेबाहेर जाऊन सायबर कॅफे व तत्सम सुविधेचा लाभ घेऊन गैरकृत्य करण्यामध्ये सहभागी होऊ शकण्याची शक्यता विचारात घेऊन संस्थेच्या वेळेत बाहेर जाणा-या विद्यार्थ्यांच्याबाबत सुरक्षेच्या दुष्टीकोनातून संस्थांनी आपापल्या स्तरावर योग्य उपाययोजना करावी. शक्य झाल्यास संस्थेच्या कॉम्प्युटर लॅबमध्ये सी सी कॅमेरा बसवून घेतल्यास संगणकाचा वापर करणा-या विद्यार्थ्यांवर वचक राहू शकेल.

आपला विश्वासू,

सु.का.महाजन

( डॉ. सु. का. महाजन )
प्र. संचालक तंत्र शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई